


Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय.

जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई- ४०० ०२३.

प्रति,

मे. अंबर डिस्टीलरीज लि.,
जि. पालघर.

क्र. एफएलआर ११२०१७/९२३/५ब

मुंबई, दिनांक २६ एप्रिल, २०१९.

विषय :- विदेशी मद्य निर्माणीमध्ये अंतर्गत बदल करण्यास परवानगी मिळणेबाबत.
**मे. अंबर डिस्टीलरीज लि., पालघर.**

संदर्भ :- १) अधीक्षक, राउशु, पालघर यांचे पत्र क्र. एफएलआर ११२०१६/१४४९/अधी दि.२७.१०.२०१६.
२) शासन गृह विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. एफएलआर ०९१७/प्र.क्र.२०३/ राउशु-२ दि. ०१.१०.२०१८.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार मे. अंबर डिस्टीलरीज लि., पालघर या विदेशी मद्य निर्माणीमध्ये अंतर्गत बदलाबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने शासनास विदेशी मद्य निर्माणीमध्ये अंतर्गत बदल करण्यास परवानगी मिळणेबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये शासनाने मे. अंबर डिस्टीलरीज लि., पालघर या विदेशी मद्य निर्माणीमध्ये खालीलप्रमाणे अंतर्गत बदल करण्यास परवानगी दिली आहे. त्याबाबतचे नकाशे प्रमाणित करुन यासोबत पाठविण्यात येत आहेत.

१. स्पिरीट स्टोरेजसाठी अतिरिक्त ४ टँक बसविणे. (नकाशात A-४)
२. १००० ब.लि. क्षमतेची (वापरात नसलेली) लाकडी टाकी काढून त्याजागी नवीन स्टेनलेस स्टीलची टाकी बसविणे व ती स्पिरीट मॅच्युरेशनसाठी वापरणे. (नकाशात A-३)
३. २५० ओकवुड लाकडी बॅरल प्रत्येकी २०० ब.लि. याप्रमाणे प्रस्तावित केले आहे. (नकाशात A-१)
४. ग्रेप स्पिरीट स्टोरेजसाठी २००० ब.लि. क्षमतेची टाकी उभारणे. (नकाशात A-१)
५. केन स्पिरीट स्टोरेजसाठी २००० ब.लि. क्षमतेची टाकी उभारणे (नकाशात A-१)
६. ब्लेंडींग विभागाचा विस्तार करुन ब्लेंडीग विभागात नव्याने १५,००० ब.लि. क्षमतेच्या ३ व ३६,००० ब.लि. क्षमतेच्या ४ स्टेनलेस स्टीलच्या ४ टाक्या उभारणे. (नकाशात अनुक्रमे B-१ व B-२)
७. ३५०० ब.लि. क्षमतेच्या स्टेनलेस स्टीलच्या ६ ओव्हर हेड Filling tanks उभारणे.
८. नविन ५ बॉटलिंग लाईन उभारणे. (नकाशात C-१,C-२,C-३)

अ) सध्या अस्तित्वात असललेल्या बॉटलिंग हॉलमध्ये १ नविन हाय स्पीड ऑटोमॅटीक लाईन उभारणे.
ब) तळ मजल्यावरील हॉल मध्ये १ सेमी ऑटोमॅटीक व १ फुल ऑटोमॅटीक हाय स्पीड लाईन उभारणे.

D:\RK 5\int. change\Amber.docx

Scanned with CamScanner

क) पहिल्या मजल्यावरील हॉल मध्ये १ सेमी ऑटोमॅटीक व १ फुल ऑटोमॅटीक हाय स्पीड लाईन उभारणे.

९. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी यांचेकरिता ऑफीस नव्याने बांधणे

१०. गोडावूनचे विस्तार करणे.

सदरचे बदल परवानगी पत्र मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत पुर्ण करुन अंतिम मंजूरीसाठी जागे नकाशाच्या चार प्रती अधीक्षकांकडून प्रमाणित करुन अधीक्षक, कार्यालयामार्फत या कार्यालयास सादर कराव्या तसेच दुरुस्त्या/सुधारणा प्रभारी अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली कराव्यात. वरील सुधारणा अंमलात आणतांना The Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, १९६६ मधील नियम १७ (३) मधील तरतुर्दीचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**मा. आयुक्तांच्या मान्यतेने.**

( पी. एच. पवार )
उप आयुक्त (मळी व मद्यार्क)
राज्य उत्पादन शुल्क, मुंबई.

प्रत,

१) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पालघर.

२) प्रभारी अधिकारी, मे. अंबर डिस्टीलरीज लि., पालघर.

D:\RK S\int. change\Amber.docx

## DESCRIPTION OF PROPOSAL & PROPERTY.

PROPOSED EXTENSION TO EXISTING FACTORY BUILDING GUT NO. 409, KUDUS, VILLAGE KHANIVALI, TALUKA - WADA, DISTRICT - THANE, PIN CODE:421303

LTD.

FOR :- M/S AMBER DISTILLERIES LTD.

Scanned with CamScanner